# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक १०/०३/२०१८**

## १)जबरी चोरी :-

**भोकर :-** दिनांक ०७.०३.२०१८ रोजी चे २१.३० वा. चे सुमारास कोंडदेवनगर पिंपळढव शिवार ता. भोकर जि. नांदेड येथे, यातील तीन आरोपीतांनी संगणमत करुन पिंपळढव शिवरातील पाऊल वाटेवर फिर्यादीचे पाठीमागुन मो. सा. क्रमांक एम. एच. २६/ए. जे. १५६१ वर येवुन फिर्यादीची गाडी आडवुन दारु पिण्यसाठी पैसे मागीतले असता फिर्यादीने पैसे देण्यास नकार दिला असता, आरोपीतांनी फिर्यादीचे पॅन्टचे खिशातील नगदी १०,०००/-रुपये जबरीने काढुन घेतले. वगैरे **फिर्यादी हाणमंत कोंडीबा कमटलवाड वय २२ वर्ष, व्यवसाय शेती रा. पोमनाळा ता. भोकर** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. भोकर** गुरनं ५५/२०१८ कलम ३९२, ३४, भादंविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/भाले, मो.क्र.९५४५०४९९७७** हे करीत आहेत.

## २)बलात्कार :-

**धर्माबाद :-** दि.२१.०८.२०१७ ते ०८.०३.२०१८ चे दरम्यान धर्माबाद, बासर, मुंबई, कल्याण, नांदेड येथे. यातील आरोपीने फिर्यादी महिलेस लग्नाचे आमीष दाखवुन विविध ठिकाणी वेळोवेळी बलात्कार केला. वगैरे **फिर्यादी २१ वर्षीय फिर्यादी महिला, व्यवसाय मजुरी रा. गांधीनगर सखोजीनगर, नांदेड** हिने दिलेल्या फिर्यादीवरून **पो. स्टे. धर्माबाद** गुरनं ६०/२०१८ कलम ३७६(आर) (एन) भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/ एम.जि. वाघमारे मो.क्र. ९९७५२७८६१०** हे करीत आहेत.

## ३) विषबाधा होऊन मृत्यु :-

**नांदेड ग्रामीण :-** दिनांक ०८.०३.२०१८ रोजीचे २३.३० वा.चे सुमारास स.द.विष्णुपुरी नांदेड येथे यातील **मयत नामे यशवंतराव बाबुराव लवटे वय ४५ वर्षे व्यवसाय शेती रा. वझर ता. देगलुर जि. नांदेड ह.मु. विष्णुपुरी नांदेड** हा मिर्ची व टरबुज या पिंकांवर फवारणी करीत असताना त्याला विषबाधा होऊन चक्कर व मळमळ होत असल्याने त्यास स.द.विष्णुपुरी येथे शरीक केले असता तो उपचारादरम्यान मरण पावला. वगैरे **खबर देणार नागरबाई भ्र. यशवंत लवटे वय ४० वर्षे व्यवसाय घरकाम, मजुरी रा. वझर ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. नांदेड ग्रामीण** आ.मृ. २२/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास पोहेकॉ/ २५०४ कदम मो.क्र. ९८२३०३१४०७** हे करीत आहेत**.**

## ४) विषारी औषध पिऊन मृत्यु :-

**तामसा :-** दिनांक ०९.०३.२०१८ रोजी चे १३.१५ वा. चे सुमारास प्राथमिक आरोग्य केंद्र तामसा जि. नांदेड येथे, यातील **मयत नामे किशन मारोतराव तुप्पेकर वय ५० व्यवसाय शेती रा. चिकाळा ता. हदगाव जि.नांदेड** हा शेतामध्ये जाऊन कोणतेतरी विषारी औषध पिले असता त्यास उपचारकामी प्राथमिक आरोग्य केंद्र तामसा येथे शरीक केले असता वैदयकीय आधिकाऱ्यांनी तो मरण पावल्याचे सांगीतले. वगैरे **खबर देणार गंगाधर मारोतराव तुप्पेकर वय ४७ वर्षे व्यवसाय शेती रा. चिकाळा ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. तामसा** आ.मृ. १०/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास पोहेकॉ/ १६४६ एस.एम. सुर्यवंशी मो.क्र. ९९२३४५११४६** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४